प्रेसनोट                दिनांक ११/११/२०२२

तहसिल कार्यालय, अलिबाग जि. रायगड येथील तहसिलदार व एजंट यांना लाच स्विकारतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने घेतले ताब्यात

| | | |
|---|---|---|
| लाचलुचप्रत प्रतिबधंक विभाग/घटक | :- | ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई |
| पोलीस ठाणे दैनंदिनी नोंद क. | :- | ४९/२०२२ दि. ११/११/२०२२ रोजी २१:३८ वाजता |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | :- | १) श्रीमती मिनल कृष्णा दळवी, वय ४९ वर्षे, तहसिलदार, अलिबाग जि रायगड.<br>२) श्री. राकेश रमाकांत चव्हाण, वय ४९ वर्षे, (एजंट) |
| लाचेची मागणी रक्कम | :- | रू. ३,००,०००/- रक्कमेची मागणी करून तडजोडी अंती रू.२,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी |
| स्विकारलेली रक्कम | :- | रू.२,००,०००/- |
| थोडक्यात हकिकत | :- | यातील तक्रारदार यांचे सास-यांचे आईने, सास-यांना बक्षीसपत्राने दिलेली जमीनीचे सास-यांचे नावे सातबारा नोंद होण्यासाठी आदेश देण्याकरीता व सास-यांचे भाउ यांनी बक्षीस पत्रावर हरकत घेतलेल्या अपिल प्रकरणाचा निकाल तक्रारदार यांचे सासरे यांचे बाजूने देण्याकरीता, आलोसे कमांक १ यांनी आरोपी क. २ यांचे मार्फतीने रू.५,००,०००/- लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक २८/०९/२०२२ रोजी ॲ.सी.बी. नवी मुंबई कार्यालयात तक्रार दिली होती.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २९/०९/२०२२ रोजीचे लाचेच्या मागणीच्या सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान आरोपी क. २ यांनी स्वत:साठी व आलोसे क. १ यांचेकरीता रू. ३,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.<br>दिनांक ११/११/२०२२ रोजी लाचेच्या मागणीची सत्यता पडताळणी कारवाई दरम्यान आलोसे कमांक १ यांनी वरील नमूद कामा करीता रू. २,००,०००/- लाचेच्या रक्कमेची मागणी करून, लाचेची रक्कम आरोपी क. २ एजंट यांच्याकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यानंतर लगेचच करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान आरोपी क.२ यांनी अलिबाग नगरपालिका इमारती समोरील आरके इलेक्ट्रॉनिक शॉपमध्ये तक्रारदार यांचेकडून रू.२,००,०००/- पंच साक्षीदारां समक्ष स्विकारले असता आरोपी क.२ यांस १७:४८ वा.रंगेहात पकडण्यात आले आहे. त्यानंतर आलोसे क. १ यांना त्यांचे राहते घराचे ठिकाणावरून ताब्यात घेण्यात आले आहे. |

**मार्गदर्शन अधिकारी –**

१) मा.श्री.सुनिल लोखंडे सो. पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे
२) मा.श्री. अनिल घेरडीकर सो. अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांचेशी संपर्क करावा.

---

संपर्कपत्ता :- ला.प्र.वि. ठाणे, मध्यवर्तीकारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१
संकेतस्थळ :- acbmaharashtra@mahapolice.gov.in
ई-मेल :- spacbthane@mahapolice.gov.in
ऑनलाईनतक्रार
ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net
टोलफ्रीनं. :- १०६४
दुरध्वनी क्र. :- ०२२-२०८१३५९८/२०८१३५९९
व्हॉटस्ॲप क्र. :- ९९३०९९७७००

शिवराज बेंद्रे
पोलीस निरीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई